# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) अंतर्गत तांत्रिक पदे कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधन तत्वावर भरणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) अंतर्गत कंत्राटी पध्दतीने मासिक एकत्रित मानधन तत्त्वावर खालील नमुद केलेली पदे ६ महिने कालावधीकरिता भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवारांनी आपले अर्ज मा.आयुक्त सो. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका जुनी एस्. टी. स्टॅण्ड, कापआळी भिवंडी यांचे नावे जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून पोस्टाद्वारे दि.१२/०७/२०१९ पर्यंत स्विकारण्यात येतील.

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | मासिक भत्ता | शैक्षणिक अर्हता | आवश्यक अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिक क्षेत्रातील तज्ञ | ०१ | ५०,०००/- | अभियांत्रिकीतील पदव्युत्तर/पदवी (पब्लिक हेल्थ इंजिनियरिंग मधील विशेषज्ञतेसह) | शासकिय/निमशासकिय /स्वायत्त संस्था/नामांकित खाजगी कंपनीतील किमान ३ वर्षाचा अनुभव, नागरी पायाभुत विकास कामांसंदर्भातील खरेदी, डिझाईन व पर्यवेक्षणाचा अनुभव मनपा अभियंता म्हणुन पुर्वीचा अनुभव असल्यास योग्य. |
| २ | सामाजिक विकास तज्ञ | ०१ | ५०,०००/- | सामाजिक शास्त्र/समाज कार्य विषयांतील पदव्युत्तर /पदवी | किमान ३ वर्षाचा अनुभव, नागरी विभागातील सामाजिक विकास कार्याचा अनुभव आवश्यक. |
| ३ | नागरी नियोजन तज्ञ | ०१ | ५०,०००/- | नियोजन विषयांतील पदव्युत्तर/पदवी | नगररचना विषयक कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव गृहनिर्माण विषयक पायाभुत प्रकल्पाचे कामाचा अनुभव आवश्यक. |
| ४ | माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ | ०१ | ५०,०००/- | कॉमप्युटर सायन्स/इलेक्ट्रॉनिक्स /एम.सी.ए./पी.जी.डी.सी.ए/आय.टी.या विषयांतील पदव्युतर/पदवी. | शासकिय/निमशासकिय/स्वायत्त संस्था/नामांकित खाजगी कंपनीतील ३ वर्षाचा अनुभव सॉफ्टवेअर विकसीत करणे, प्रकल्प व्यवस्थापन व एमआयएस बाबत अनुभव आवश्यक. |

**सर्वसाधारण अटी व शर्ती**

१. गृहनिर्माण योजनेचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.
२. अर्जासोबत प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती जोडण्यात याव्यात. (जन्मतारीख, शिक्षण, अनुभव तसेच अन्य शैक्षणिक प्रमाणपत्र इत्यादी)
३. अर्जामध्ये संपुर्ण नाव, पत्ता (पिन कोडसह), शैक्षिणीक अर्हता, पुर्वानुभव नमुद करावा. तसेच पासपोर्ट आकाराचे छायाचित्र जोडावे.
४. नेमणुकीसंदर्भात निवड समितीने घेतलेले सर्व निर्णय अंतिम राहतील.

५. सदर नेमणूक संपुर्णपणे अस्थायी स्वरुपाची असून कोणत्याही उमेदवारास सदर जाहीर सुचनेच्या अनुषंगाने सेवेत कायम /नियमीत केले जाणार नाही निवड झालेल्या उमेदवारास विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र करुन द्यावे लागेल.

६. नियुक्ती देणे / नाकारणे तसेच नमुद कालावधीचे आंत सेवेतुन कमी करणेबाबत अधिकार मा.आयुक्त यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

सही/-
**उप-आयुक्त (मुख्यालय)**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**

**मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने.**